## : प्रकरण पहिले :

## : बाबूराव ठाकूर : स्वातंत्र्य चळवळीतील कार्य आणि योगदान १९१९-५५ :

भारताच्या २० व्या शतकातील पूर्वार्धाचा इतिहास म्हणजे मुख्यत्वे करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास होय. मुख्यत: या चळवळीचे नेतृत्व काँग्रेस पक्षाने केले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली चळवळीने व्यापक टप्पे ओलांडले, आणि ही चळवळ ख-या अर्थाने देशव्यापी चळवळ झाली. विविध प्रांतातून स्थानिक नेतृत्व उदयास आले, ज्यानी काँग्रेसचे राजकीय, सामाजिक कार्यक्रम यशस्वीपणे राबविले. बेळगाव आणि बेळगावचा परिसर स्वातंत्र्य चळवळीच्या प्रभावाखाली याच शतकाच्या पहिल्या दशकात आला.

### बेळगावची भौगोलिक परिस्थिती:

बेळगाव शहर हे आज कर्नाटक राज्यातील जिल्हयाचे व प्रशासकीय विभागाचे प्रमुख ठिकाण आहे. लोकसंख्या छावणीसह ३,००,२९० ( सन १९८१ च्या जनगणनेनुसार ) आहे. हे शहर मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर वसले आहे. कर्नाटक व महाराष्ट्र राज्याच्या सीमेवरील हे शहर पश्चिम घाटाच्या उतारावर समुद्र सपाटीपासून सुमारे ७६० मीटर उंचीवर , पुणे शहरापासून २४५ मैलावर ( रेल्वेने ) वसले आहे [१]. बेळगावचे हवामान जवळ जवळ वर्षभर थंड असल्यामुळे या शहरास गरीबांचे " महाबळेश्वर " म्हणतात [२]. हे शहर गोवा व पश्चिम किनारपट्टीकडे जाणा-या मार्गाचे प्रवेशद्वार असल्याने त्यास राजकीय व ऐतिहासिकदृष्टया महत्व आहे.

..

बेळगाव शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

बेळगावचे मुळ नाव " वेळुग्राम " असल्याचा उल्लेख आढळतो [3]. पूर्वी येथे बांबूचे वन होते म्हणून त्यास वेळुग्राम असे नांव पडले. पुढे त्याचा अपभ्रंश बेळगाव असा झाला.

बेळगाव शहरासंबंधीचे त्रोटक उल्लेख इतिहासात सापडतात. हा परिसर होयसाळा ( १०२२-१३४२ ) साम्राज्याचा महत्वाचा भाग होता. रट्टानी हे शहर सन १२०५ मध्ये जिंकले व त्यांचे राजधानीत परिवर्तन केले. पण ते या भागावर फार काळ राज्य करु शकले नाहीत. यादवानी सन १२५० मध्ये ते त्यांच्याकडून जिंकून घेतले. सन १३११ मध्ये यादवांचा ऱ्हास झाला. सन १३७५ मध्ये बेळगाव विजयनगर सम्राटानी पादाक्रांत केल्याचा उल्लेख सापडतो. सन १७५४ मध्ये नानासाहेब पेशव्याने ( १७४०-६१ ) बेळगावला मराठयांच्या वर्चस्वाखाली आणले. तर सन १८१८ मध्ये इंग्रजानी हे शहर जिंकले व त्याचा धारवाड जिल्हयात ( कर्नाटक राज्य ) समावेश केला [4]. अशा त-हेने सन १८१८ पासून बेळगांववर ब्रिटिशांची अनिर्बंध सत्ता राहिली. जसजसा बेळगावचा विकास होत गेला, तसतसे प्रशासनाच्या सोयींसाठी सन १८३६ मध्ये बेळगाव धारवाडपासून वेगळे करुन त्यास स्वतंत्र जिल्हयाचा दर्जा देण्यात आला. पुढे १८५१ मध्ये बेळगाव शहरास म्युनिसिपालटीचा दर्जा देण्यात आला [5].

बेळगाव शहराची शैक्षणिक व सामाजिक परिस्थिती:

बेळगाव शहर ब्रिटिश साम्राज्याचा अविभाज्य घटक बनल्यामुळे १९ व्या शतकाच्या उतरार्धात त्याची शैक्षणिक प्रगती झपाटयाने झाली. सन १८३२ मध्ये येथे मिशन स्कूलची स्थापना झाली. सन १८४८ मध्ये नेटिव्ह जनरल लायब्ररीची तर सन १८५० मध्ये सरदार्स हायस्कूल या प्रसिध्द शाळेची

..

स्थापना झाली. सन १८८९ मध्ये बेळगाव शहरात रेल्वेची सोय[६] झाल्यामुळे बेळगावचा आर्थिक व शैक्षणिक विकास झपाट्याने झाला.

बेळगाव शहरात हिन्दु, मुस्लिम व ख्रिश्चन या तीन धर्माचे लोक मुख्यत: आढळतात. हा भाग बरीच वर्षे मुस्लिम सत्तेच्या अधिपत्याखाली असल्याने, मुस्लिमांची संख्या बरीच मोठी आहे. तसेच पोर्तुगिज सत्तेच्या वर्चस्वाखालील गोवा जवळ असल्याने व बेळगावात ख्रिस्ती धर्म प्रसारास वाव मिळाल्याने, ख्रिस्ती समाजसुध्दा मोठया प्रमाणात आढळतो. आर्य समाजाने ख्रिस्ती धर्मउपदेशकांना विरोध केल्यामुळे, कांही अंशी हिन्दु - ख्रिस्ती समाजात तणाव होता [७]. पण तो मर्यादित स्वरूपातच राहिला.

बेळगाव परिसरात हिन्दु-मुस्लीम संबंध मैत्रीपूर्ण व सलोख्याचे होते. त्यांच्यात धार्मिक तणाव वाढून दंगे झाल्याचे उदाहरण सापडत नाही. उलट मरिहळीचे ( तालुका बेळगाव ), इनामदार रा.खादीर बेळगावच्या मारुतीच्या मंदिराच्या पालखीचे पंच म्हणून अनेक वर्षे काम करीत होते [८]. तसेच नैसर्गिक आपत्ती प्रसंगी दोहोत सलोखा दिसतो. सन १९०५ मध्ये बेळगाव शहरात प्लेगाच्या साथीने आणि सन १९१८ मध्ये इन्फ्ल्यूएंझा रोगाच्या साथीने जेंव्हा धुमाकूळ घातला होता, तेंव्हा रोग पिडीतांच्या मदतीसाठी जी " स्वयंसेवक संघटना " निर्माण करण्यात आली होती, त्यात हिन्दु व मुस्लिम तरुण सहभागी झाले होते [९]. तसेच राजकीय क्षेत्रातही या दोन जमातीत सलोखा दिसतो. याचे प्रतिक म्हणजे स्थानिक हिन्दु नेत्याबरोबर बेळगांवचे प्रसिध्द गवई व मुस्लिमांचे नेते अब्दूल करीमखाँ व इतर मुस्लीम नेते " स्वराज्याचा " प्रसार करण्यासाठी व तो यशस्वी करण्यासाठी अहोरात्र झटत होते [१०].

<u>बेळगावची राजकीय परिस्थिती:</u>

इसवी सनाच्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धात बेळगावचे स्थानिक पातळीवरील नेतृत्व मुख्यत: गंगाधरराव देशपांडे ( १८७१-१९६० ) व

..

गोविंदराव याळगी ( १८८४-१९२३ ) यांच्या हाती मर्यादित होते. त्यांच्यावर क्रांतीकारी विचाराचा प्रभाव पडल्यामुळे ते क्रांती कार्याकडे आकृष्ट झाले होते. त्यानी ' मॅझिनी क्लब ' या क्रांतीकारी संघटनेची स्थापना करून त्याव्दारे तरूणाना बॉम्ब तयार करण्याचे व हाताळण्याचे प्रशिक्षण देत होते [११]. या क्लबच्या सदस्यांनी ' आलार्म ' बॉम्ब तयार करून त्याच्या सहाय्याने बेळगांव जवळील कुडची रेल्वे स्टेशन जवळच्या रेल्वे पुल उडवून देण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. तसेच प्लेग निवारणाच्या नावाखाली बेळगाव शहरात ( १९०५ ) पोलीस व अधिका-यानी केलेल्या अन्याय व अत्याचारा विरूध्द गोविंदराव याळगी व गंगाधरराव देशपांडे यानी ' मॅझिनी क्लबच्या' सहका-यांच्या सहाय्याने तरूण वर्गात इंग्रज विरोधी तीव्र भावना निर्माण केली होती.

पुढे गंगाधरराव व गोविंदरावाना क्रांतीकारी चळवळीच्या मर्यादा लक्षात आल्या व लोकमान्य टिळकांचा राजकारणातील प्रभाव पाहून ते लोकमान्य टिळकाकडे वळले. अशाप्रकारे गंगाधरराव व गोविंदराव क्रांतीकारी चळवळीपासून परावृत होऊन लो.टिळकांच्या जहालमतवादाकडे ओढले गेले व त्यानी बेळगांव शहर व जिल्हयात कॉंग्रेसचा प्रत्येक कार्यक्रम यशस्वीपणे राबवून बेळगाव जिल्हयाला कॉंग्रेसप्रणीत राजकीय चळवळीत ओढून नेले. त्यामुळे लो.टिळक व म.गांधीना बेळगांव विषयी आदर वाटत असे [१२].

वंगभंग आंदोलन :

२० जुलै,१९०५ रोजी लॉर्ड कर्झनने जनमताची कदर न करता बंगाल प्रांताची फाळणी करून राष्ट्र जागृतीची ज्योत दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. परिणामत: फाळणीमुळे देशभर असंतोष निर्माण झाला व यातून ' वंगभंग आंदोलनाचा ' जन्म झाला. या आंदोलनास गती देण्यासाठी

..

लो.टिळकानी ( १८५६-१९२० ) चतु:सुत्री कार्यक्रम - स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य जाहिर करताच स्वातंत्र्य चळवळीस उधान आले [१३].

गंगाधरराव देशपांडे ( १८७१-१९६० ) गोविंदराव याळगी ( १८८४-१९२३ ) यांनी संपूर्ण बेळगाव जिल्हयात दौरे काढून,व्याख्याने देऊन लोकमान्यांचा कार्यक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहचविला. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून त्यानी स्वदेशी कापडाचे दुकान ( १९०५ ), स्वदेशी किराणा दुकान (१९०५ ) व राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रसारासाठी बेळगांव शहरात गणेश विद्यालय ( १९०५ ) सुरू केले [१४]. तसेच जनतेत स्वराज्याची भावना निर्माण करण्यासाठी त्यानी अनेक व्यक्तिंची " स्वराज्यावर " भाषणे आयोजित केली. गंगाधरराव व गोविंदराव याळगी यानी समस्त बेळगाव परिसर आपल्या प्रभावी वक्तव्यानी पिंजून काढला. परिणामत: बेळगाव परिसरात स्वातंत्र्याच्या भावनेने भारलेली एक नवी तरूण पिढी निर्माण झाली [१५]. या पिढीतील एक तरूण म्हणजे धोंडो राजाराम उर्फ बाबुराव ठाकूर होते. म्हणून त्यांच्या जीवन कार्याची माहिती घेऊ.

## बाबुराव ठाकूर : कौटुंबिक पार्श्वभूमी :

ठाकूर कुटुंबियांची गौड सारस्वत ब्राम्हण कुटुंबात गणना होते.[१६(अ)] ते रत्नागिरी जिल्हयातील म्हापणचे मुळ रहिवासी.[१६ब] ठाकूर कुटुंबिय मोल मजूरी करून उदरनिर्वाह करीत असल्यामुळे आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. त्यातच नेहमीच मजूरी मिळेल याची खात्री नसल्यामुळे एकूण जीवनक्रम म्हणजे ओढाताणच.

बाबुरावांच्या पूर्वजांची सलग माहिती गोपाळरावापासून उपलब्ध होते. त्यांना ठाकूर वंशजाची पहिली ज्ञात व्यक्ती म्हटले तरी वावगे ठर

..

नये. या त्रासमय जीवनास कंटाळून बाबुरावांच्या पूर्वजानी ( कै. गोपाळराव ठाकुरांचे वडील) उदर निर्वाहासाठी म्हापण सोडले व मटकंती करीत सध्याच्या कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील कोरीवडे येथे स्थाईक झाले [१६(क)]. मुळ गावात बदल झाला तरी, प्रथमत: गोपाळरावाच्या वडीलाना व गोपाळरावाना मोल मजूरीच करावी लागली. पण त्यांच्या प्रयत्नावादी व जिद्दी स्वभावामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारू लागली. कोरीवडे येथे त्यांचा चांगला जम बसला. थोड्याच कालावधीत त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे त्यांना गावात मान व प्रतिष्ठा मिळू लागली. गोपाळरावांनी कोरीवडे या गावी थोडी जमीन व घर खरेदी केले.

गोपाळराव ठाकूरांना परिस्थितीची जाणीव होती. स्व:सामर्थ्यावर त्यांनी आपली आर्थिकस्थिती सुधारली. आपल्या वाटेला आलेले कष्टमय व त्रासदायी जीवन आपल्या मुलांच्या वाटयाला येऊ नये, याकरिता त्यांनी शिक्षण घ्यावे व सुसंस्कृत व्हावे अशी पितृ सुलभ इच्छा गोपाळरावांची होती, म्हणून ते प्रथमपासूनच आपल्या चिरंजीवांच्या म्हणजे राजारामाच्या शिक्षणा विषयी दक्ष होते. कोरीवडे गावात शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याने त्यांनी आपल्या चिरंजीवाना शिक्षणासाठी बेळगाव या ठिकाणी पाठविले.

राजाराम हुशार व एकपाठी असल्याने ते शिक्षकांचे आवडते होते [१७]. राजारामानी मुलकी पर्यंत ( सातवी ) शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्वरीत बेळगावातील बेननस्मिथ हायस्कूल या प्रसिध्द शाळेत नोकरी मिळाली [१८]. त्यानी आपल्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात शिक्षक म्हणून केली. आपला मुलगा शिक्षण संपवून नोकरी करीत आहे, स्वत:च्या पायावर उभा राहिल्याचे पहाताच गोपाळरावानी राजारामाचा विवाह चंदगड

..

तालुक्यातील श्रीपादवाडी गावच्या रमाबाईशी केला. लहान वयातच त्यांच्या संसारीक जीवनाची सुरूवात झाली.

राजारामानी व्यावसायीक जीवनाची सुरूवात शिक्षक म्हणून केली असली तरी या पेशात ते फार काळ रमू शकले नाहीत. अवघ्या दोनच वर्षात ही नोकरी सोडून ते पोलीस खात्याच हवालदार म्हणून भरती झाले. राजाराम ठाकूरांनी पोलीस खात्यात एकूण २४ वर्षे नोकरी केली. शिस्तप्रियता व निर्भयता या अंगभूत कर्तबगारीच्या बळावर त्यांची सतत खातेनिहाय हवालदार, ठाणे अंम्मलदार म्हणून बढती होती गेली व शेवटी फौजदार पदापर्यंत पोहचले [१९]. या काळात त्यानी अनेक धाडसाची कामे केली. त्यानी बेळगांव परिसरातील जनतेवर व पोलीसावर दहशत बसविणाऱ्या सत्या बेरड ज्याचे बेळगाव जवळच्या सुतकट्टीच्या मेसूर घनदाट जंगलात वास्तव्य होते. त्यास त्यानी स्वत:चा जीव धोक्यात घालून पकडले. या त्यांच्या धाडसी कृत्याचा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यानी पुढे रितसर गौरव केला [२०]. पोलीस खात्यात फौजदार म्हणून त्यानी बेळगाव, चिक्कोडी, निपाणी आदि ठिकाणी काम केले व कायद्याचे कोटेखोपणे पालन करून सर्वसामान्य जनतेत सुरक्षिततेची भावना, निर्माण करण्याचा त्यानी प्रामाणिक प्रयत्न केला. राजारामांच्या शिस्तप्रिय वृत्ती, मोडेल पण वाकणार नाही स्वभावामुळे वरिष्ठाकडून त्रास होऊ लागला. यास कंटाळून सन १९२८ मध्ये त्यानी फौजदार पदाचा राजीनामा दिला [२१].

राजारामांची बरीचशी हयात बेळगाव शहर व परिसरात गेली होती. त्यामुळे परिसराविषयी त्यांच्या मनात आपुलकी निर्माण झाली होती, म्हणून त्यानी वडीलांच्या ( गोपाळराव ) मृत्यूनंतर बेळगाव येथे स्थाईक होण्याचे ठरविले. वडील असेपर्यंत कोरीवडेशी त्यांचा संपर्क होता, पण वडीलांच्या निधनानंतर त्यानी बेळगांवातच स्थाईक होण्याचा निर्णय घेतला.

..

बाबुराव ठाकूर: बालपण व शिक्षण ( १८९९-१९२० ):

बाबुरावांचा जन्म दिनांक २६ डिसेंबर,१८९९ रोजी चंदगड तालुक्यातील आजोळी श्रीपादवाडी ( जिल्हा कोल्हापूर ) येथे झाला [२२]. राजाराम व रमाबाईंचे ते चौथे अपत्य होय. राजाराम ठाकूरांची पूर्वीची बरीच अपत्ये वारली होती. हा तरी मुलगा दगडा - धोंड्याप्रमाणे घडधाकट व्हावा या समजूतीने त्यांच्या आजीने ( रमाबाईंच्या आईने ) त्यांचे नाव धोंडू असे ठेवले [२३], आणि हे अपत्य जगले. पण जस जसे ते मोठे होऊ लागले तस तसे धोंडू नाव खटकू लागले, तेंव्हा त्यावर तोडगा म्हणून घरातील सर्वजन त्याना ' बाबु ' या नावाने संबोधू लागले व पुढे ते त्याच नावाने परिचित व प्रसिध्द झाले. राजाराम ठाकूरांचा शेवटचा मुलगा यशवंतराव ठाकूरांचा जन्म दिनांक २१ जुलै १९०१ मध्ये आजोळी श्रीपादवाडी ( तालुका चंदगड, जिल्हा कोल्हापूर ) येथे झाला [२४]. बाबुरावाना तीन जेष्ठ भगिनी - चिम्माक्का, शांता व सुभद्रा होत्या.

राजाराम ठाकूरांना आपल्या मुलांनी योग्य प्रकारचे शिक्षण घ्यावे असे मनापासून वाटत होते, म्हणून त्यांनी आपल्या सर्व मुलीना इयत्ता सातवी पर्यंत शिक्षण देऊन मगच त्यांचे विवाह केले होते. मुलीप्रमाणे मुलांनीही शिकावे असे त्याना वाटत असे. बाबूरावांच्या शैक्षणिक जीवनाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही, उलट त्रोटक माहिती उपलब्ध आहे. बेळगाव येथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण सन १९१३ मध्ये पूर्ण झाले व सन १९१३-१४ मध्ये त्यांचे नाव इयत्ता पाचवीमध्ये बेळगाव येथील सरदार्स हायस्कूलमध्ये दाखल केले, आणि वयाच्या २० व्या वर्षी जून १९१९ मध्ये ते एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण झाले [२५].

..

बाबुरावाना अभ्यासापेक्षा अभ्यासेत्तर गोष्टीमध्ये अधिक रस होता. अभ्यासाच्या क्रमिक पुस्तकापेक्षा इतर पुस्तकाचेच वाचन करणे त्याना अधिक पसंत होते. याशिवाय हॉकी व क्रिकेट या खेळात त्याना रस होता.[२६] ते एक चांगले खेळाडु होते व या खेळात शाळेला अनेक बक्षीसेही मिळवून दिली होती. अभ्यासापेक्षा खेळातच अधिक भर देण्याविषयी राजाराम ठाकूराना दिसताच, त्यानी बाबुरावांना ब-याचवेळा समजावून सांगितले, पण पालथ्या घागरीवर पाणी. त्याचे मन क्रमिक पुस्तकात रमत नव्हते [२७]. त्याचे अवांतर वाचनावर भर होता. त्यात प्रामुख्याने मॅझिनीचे चरित्र, नेपोलियन बोनापार्ट व स्वामी विवेकानंदाचा समावेश होता. परिणामत: विवेकानंदाचे स्वदेश व स्वधर्माभिमान, मॅझिनीचे स्वदेशप्रेम, शौर्य, नेपालियनचे शौर्य या गोष्टींचा बाबुरावांच्या युवा मनावर खोलवर गंभीर प्रभाव पडला नाही तर नवलच. त्याचबरोबर देशातील तत्कालीन राजकीय वातावरण बाबुरावांच्या वाचनास पुरक व पोषक ठरले.

एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण होताच बाबुराव ठाकूर यांनी सांगलीच्या विल्डिंन महाविद्यालयात सन १९१९ जून मध्ये इंटरच्या वर्गात प्रवेश घेतला. पण शालेय शिक्षणात जो प्रकार झाला तोच प्रकार महाविद्यालयीन शिक्षणात झाला. बाबुराव अभ्यासेत्तरबाबीत अधिक रमले. त्यांच्या दीर्घ अवांतर वाचनामुळे त्यांची मानसिक जडण घडण होत गेली. वैचारिक बैठक निर्माण होऊ लागली, चांगल्या - वाईटांची जाण निर्माण होऊ लागली. आपण समाजाचे कांहीतरी देणे लागतो, समाजासाठी कांहीतरी केले पाहिजे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ लागली. याचा परिपाक म्हणजे, आपल्या तरूण सहकार्यांच्या मदतीने त्यानी सामाजिक कार्याचा श्रीगणेशा दिनांक २५ आक्टोबर,१९१८ रोजी "भारत वैभव समाज "नावाची संस्था स्थापन करून केली [२८].सामाजिक जागृती,

समाजसुधारणा व कामगार वर्गात शिक्षण प्रसाराच्या उच्च ध्येयाने प्रेरित झालेल्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून बाबुरावानी एक ग्रंथालय, डिबेटींग सोसायटी, कामगार वर्गासाठी एकूण सात शाळा स्थापन केल्या, पण याहून महत्वाचे बाबुरावानी या संस्थेतर्फे " विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी मासिक " चालविण्याची संकल्पना राबविली. यामासिकाचे संपादक, प्रकाशक, वाचक, लेखक व प्रचारही तरूण विद्यार्थी वर्गातच होणार असल्याने सदर मासिकाचे नाव " तरूण भारत " ठेवण्यात आले [२९]. या मासिकाचा आरंभ मे - जुन १९१९ पासून झाला [30].पण आर्थिक अडचण व स्वातंत्र्य युध्दातील सक्रिय सहभाग यामुळे हे मासिक आक्टोबर १९२४ पासून बंद पडले [३१].
सन १९२०-२१ या शैक्षणिक वर्गात बाबुरावानी महाविद्यालयाच्या ( विलिंग्डन, सांगली ) दुसऱ्या वर्गात प्रवेश घेतला. पण दरम्यान म.गांधीनी असहकार चळवळीची घोषणा केली व त्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सरकारी शाळा, महाविद्यालय, न्यायालये यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन त्यानी भारतीयाना केले. त्यांच्या या आवाहनास देशाच्या विभिन्न भागातून उत्तम प्रतिसाद मिळाला. इतर अनेक विद्यार्थ्यांप्रमाणे बाबुरावानी सुध्दा शिक्षणाकडे पाठ फिरविली व स्वातंत्र्याच्या रणकुंडात झोकून दिले [३२]. अशात-हेने त्यांची विद्यार्थी अवस्था अनपेक्षितरित्या अपूर्णावस्थेत संपुष्टात आली. तेंव्हा पासून त्यांच्या जीवनाला नवीनच कलाटणी मिळाली. पण त्याचे भाऊ यशवंतरावाने सन १९२४ मध्ये बी.ए. व १९२७ मध्ये एल.एल.बी.ची परीक्षा उत्तीर्ण होऊन [33] बेळगाव येथे वकीलीचा व्यवसाय सुरू करून वडीलांची इच्छा पूर्ण केली. बाबुरावांचे हे कृत्या त्यांच्या वडीलांना आवडले नाही. पण बाबुराव आपल्या ध्येयापासून कधीही विचलीत झाले नाहीत.

विसाव्या शतकातील पहिल्या दोन दशकातच लो. टिळकांच्या जहालमतवादाचा भारतीय राजकीय जीवनावर व स्वातंत्र्य चळवळीवर खुप

..

प्रभाव होता. मुख्यत: हिन्दुस्थानातील तरूण वर्ग त्यांच्या जहालमतवादाकडे आकर्षित झाला होता. बेळगाव परिसरात गंगाधरराव देशपांडे (१८७१ - १९६० ) व गोविंदराव याळगी (१८८४-१९२३ ) यानी लोकमान्य टिळकांच्या जहालमतवादी राजकीय कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसारात पुढाकार घेतला होता. लोकमान्य **टिळक** स्वत: १९०६ मध्ये गणपती उत्सव प्रसंगी, १९०७, १९१६ मध्ये बेळगावला गेले होते. अन्य विद्यार्थ्यांप्रमाणे बाबुरावाना पण त्याना प्रत्यक्षा पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची संधी मिळाली. त्यामुळे बाबुराव लो.टिळकांच्या नेतृत्वाकडे आकर्षित झाले [३४].

हिन्दुस्थानात लो.टिळक व म.गांधी सन १९२० मध्ये आंदोलन करण्याचा विचारात असताना १ ऑगष्ट,१९२० रोजी लो.टिळकाचे मुंबईत निधन झाले. त्यांच्या अंत्ययात्रेस बाबुराव ठाकूर हजर होते. त्यांच्या मृत्यूमुळे बाबुरावाना अतीव दु:ख झाले व त्यानी ' भारत अनाथ झाला ' अशा मथळ्याखाली ' तरूण भारत ' वृतपत्रातून संपादकीय लिहून ' हिन्ददेवीच्या मुकूटातील सर्वात दैदिप्यमान असा हिरा एकाकी गळून पडला, आम्हा हिन्दवासीयास मार्ग दाखविणारा सूर्य एकाएकी अस्तास गेला' [३५] असे लिहून आपले दु:ख व्यक्त केले. तर ' युग पुरूषाचा दु:खत अंत झाला ' [३६] असे बा.य.देशपांडे म्हणतात. एवढेच नव्हे तर बाबुराव ठाकूर यानी नोव्हेंबर १९२० चा ' तरूण भारत ' चा लो.टिळकावर खास अंक काढला होता. यावरून बाबुराव ठाकूर यांना लो.टिळकाविषयी आदर होता हे दिसून येते, म्हणून लोकमान्य टिळक माझे ' दैवत ' होते असे ठाकूर म्हणतात [३७].

सन १९२० मध्ये लो.टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणात म.गांधीचा उदय झाला व मोठया संख्येने युवावर्ग त्यांच्याकडे व त्यांच्या राजकीय कार्यक्रमाकडे आकृष्ट झाला.त्यामध्ये बाबुराव ठाकूर सक्रिय उतरल्याचे दिसते.

..

बाबुराव ठाकूर : असहकार आंदोलन :

"रौलेक्ट कायदे" ( फेब्रुवारी,१९१९ ) जालियनवाला बाग हत्याकांड ( १३ एप्रिल,१९१९ ) खिलपत चळवळ, हंटर कमिशनचा अहवाल इत्यादि अनेक कारणामुळे म.गांधीनी ब्रिटिश सरकारशी असहकार करण्याचे ठरविले. म.गांधीचा असहकार कार्यक्रम सप्टेंबर,१९२० च्या कलकत्ता कॉंग्रेसच्या खास अधिवेशनात [३८] व डिसेंबर १९२० च्या कॉंग्रेस अधिवेशनात ( नागपूर ) असहकारतेचा ठराव पुढीलप्रमाणे पास केला [३९] व त्यास मंजूरी दिली.

ठ रा व

१) सरकारी शाळा - कॉलेजवर बहिष्कार टाकावा.
२) सरकारी कोर्ट - कचेरीवर बहिष्कार टाकावा.
३) सरकारने दिलेल्या पदव्यांचा, मानाचा त्याग करावा.
४) सर्व सरकारी समारंभावर बहिष्कार घालावा.
५) कायदे मंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालावा.
६) ब्रिटीश मालावर बहिष्कार घालावा.
७) हिन्दु - मुस्लीम यांच्यात ऐक्य रहावे.
८) स्वदेशी वस्तु व उद्योगधंदाना उत्तेजन द्यावे.
९) दारूबंदी प्रचार करणे, इत्यादि.

महात्मा गांधीनी अहिंसेवर आधारीत नागपूर अधिवेशनानंतर असहकारतेचा आदेश देऊन विद्यार्थ्यांनी शाळा - कॉलेजवर बहिष्कार घालावा व त्यानी चळवळीत सहभागी व्हावे असा आदेश देताच संपूर्ण हिंन्दुस्थानात अभूतपूर्व आंदोलन सुरू झाले. भारतातील हजारो विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजला रामराम ठोकून स्वातंत्र्य आंदोलनात उड्या घेतल्या.

..

यावेळी म्हणजे सन १९२१ मध्ये बाबुराव ठाकूर सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात इंटरच्या दुसऱ्या वर्गात (college second year ) शिकत होते. या झंझावती चळवळीचा परिणाम राष्ट्रीय मनोवृत्तीच्या ठाकूरांच्या मनावर झाला व ते कॉलेज सोडून ( १९२१ ) भारताच्या स्वातंत्र्याच्या लढयात उतरले [४०].

बाबुरावानी महाविद्यालय सोडून असहकार आंदोलनात उडी घेऊन सांगली येथे विद्यार्थी संघटना बांधून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या तत्वाचा प्रसार करून चळवळ तीव्र करण्याचा प्रयत्न केला, पण त्याना म्हणावे तसे यश मिळाले नाही. म्हणून त्यांनी सांगली ( महाराष्ट्र राज्य ) सोडली व बेळगावला प्रयाण केले. सांगलीच्या तुलनेत बेळगाव जिल्हयात असहकार चळवळीने जोर धरला होता. गंगाधरराव देशपांडे व गोविंदराव याळगी हे " कॉंग्रेस स्वयंसेवक संघटना " ( १९२० ) निर्माण करून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, मद्यपान निषेध इत्यादि कार्यक्रम राबवित होते. बाबुराव या संघटनेचे सदस्य ( १९२१ ) झाले व गंगाधरराव देशपांडे व गोविंदराव याळगी यानी 'मद्यपान निषेध'( निरोधने ) चळवळीचे नेतेपद बाबुराव ठाकूर व शिवराम कोप्पळ ( बेळगाव ) यांच्याकडे सुपूर्त केले. बाबुरावानी ही चळवळ अधिक तीव्र करून शहरातील प्रत्येक दारू गुत्यासमोर निरोधने करून शहरातील गुत्ते जवळ जवळ सहा महिने बंद पाडले [४१]. मद्यपान निषेध व निरोधन कार्यक्रम जोरात चालूनही बेळगावातील कॅम्प हद्दीमध्ये भरवस्तीत दारू गुत्ता चालू होता. हे बाबुराव व शिवराम कोप्पळ व त्यांच्या स्वयंसेवक संघटनेस समजताच त्या गुत्यावर निरोधन करण्यासाठी उभे राहिले. त्यामुळे दारू दुकानदाराचे नुकसान होऊ लागले म्हणून त्यानी चिडून सरकारकडे तक्रार केली. यावेळी कांही अनुचित प्रकार घडू नये म्हणून श्री. टर्नर व श्री. रिंग नावाचे दोन अँग्लो इंडियन

..

पोलिस इन्स्पेक्टर बंदोबस्तासाठी सतत फिरत होते. दरम्यान कामत गल्लीतील दोन मद्यपी दारू पिण्यासाठी आले. त्याना निरोधन करणा-यानी समजावून सांगून सुध्दा न ऐकता दारू पिऊन आले. तेंव्हा मद्यपीना घडा शिकविण्यासाठी त्या दोघा मद्यप्यांची गाढवावरून धींड काढली [४२]. तेंव्हा पोलिसानी चिडून खोटे साक्षीदार तयार करून कोर्टात केस दाखल करताच त्याना व इतर पाच जणाना तीन महिन्याची शिक्षा झाली [43]. बेळगाव शहरात आज ज्या ठिकाणी सरकारी गुदाम आहेत, तेथे पूर्वी तुरूंग होता. त्या तुरूंगात बाबुराव ठाकूर, शिवराम कोप्पळ व इतराना ठेवण्यात आले होते. ज्या वयात विद्यार्थ्यांनी खेळावयाचे, आनंदाने नाचावयाचे असते त्या वयात या विद्यार्थ्यांना खडी फोडणे, चक्की पिसणे इत्यादि कष्टाची कामे करावी लागली [४४]. पण तारूण्यात राष्ट्रवादी भावनेने प्रेरीत झालेले ठाकूरांसारखे तरूण ते काम राष्ट्रासाठी आनंदाने करू लागले.

<u>तुरूंगातील दिनचर्या :</u>

सकाळी उठल्यावर कैद्याना शौचास घेऊन जात असत. आडोसा नसलेल्या दगडावर बसून त्याना तो विधी उरकावा लागे. त्यानंतर चहापाणी देऊन कामावर नेत असत. तेथे त्यांच्याकडून जनावराप्रमाणे काम करून घेत असत. कामात कुचराई केली तर दंडुक्याचा प्रसाद मिळत असे. दुपारी दोन वाजता दोन भाकरी व पाल्याची भाजी देऊन कैद्याना बंद केले जात असे [४५]. शिक्षेचा कालावधी संपताच बाबुराव ठाकूर, शिवराम कोप्पळ आदिंची सुटका झाली [४६].

कैदेतून सुटून आल्यानंतर बाबुराव ठाकूर व इतर विद्यार्थी कॉंग्रेसची छोटी मोठी कामे करीत होती. उदा. पत्रके वाटणे, सभेची तयारी- व्यवस्था करणे आदि. तसेच एकदा असहकार चळवळीच्या प्रसारासाठी म.गांधी व मौ.शौकत अली ( आक्टोबर,१९२० ) मध्ये बेळगावला आले होते.

..

तेंव्हा किल्ला मैदानावर झालेल्या सभेस २० हजार लोक जमले होते. सभेच्या व्यवस्थापनेचे काम गंगाधरराव देशपांडे व गोविंदराव याळगी यानी बाबुराव ठाकूर व शिवराम कोप्पळ यांच्या संघटनेकडे सोपविले होते [४७]. या सभेत म.गांधीनी लोकमान्य टिळक स्वराज्य फंड ( एक कोटीचा ) या नावाने गोळा करण्याचे आवाहन [४८] करून निधीची मागणी करताच स्त्री-पुरूषांनी आपआपल्यापरीने निधी म.गांधीच्या झोळीत टाकला. हा निधी गोळा करण्यात ठाकूर व कोप्पळ यांच्या संघटनेचा महत्वाचा सहभाग होता. बेळगांव शहर व आसपास असहकार चळवळ तीव्र बनली होती. बाबुराव ठाकूर दत्तोपंत मजली, जीवनराव कृष्णाराव माळगी, कृष्णाराव करगुप्पीकर, हणमंतराव नाईक, केशवराव मोखले, डॉ.राममाऊ जोशी, पाच्छापूरकर, श्री.देशपांडे बा.य. इत्यादि मंडळी सत्याग्रह करून तुरूंगात गेली होती [४९]. बेळगांवातील या चळवळीचे वैशिष्ट म्हणजे बाबुराव ठाकूरांच्या प्रेरणेमुळे पुरूषाप्रमाणे स्त्रीयानी या चळवळीत भाग घेतला होता. सौ.शांताबाई शिवराम कोप्पळ यांच्या नेतृत्वाखाली स्त्रीयानी चळवळीत भाग घेतला व स्वदेशी चळवळीस, मालास उत्तेजन देण्यासाठी आयुष्यभर खादीचीच साडी ( जी ओबडधोबड असते ) नेसण्याचा निश्चय केला [५०]. ही गोष्ट खरोखर कौतुकास्पद आहे.

पण असहकार आंदोलन सर्वत्र असे भारात असताना चौरा-चौरी येथील हिंसक प्रकारामुळे तत्वनिष्ठ म.गांधीनी ही चळवळ अचानक बंद केली. पण हा निर्णय अनेक राजकीय नेत्याना आवडला नाही. त्यामुळे कॉंग्रेसमध्ये फेर व नाफेर असे दोन गट पडले. म.गांधी आपला निर्णय बदलण्यास तयार नव्हते. गंगाधरराव देशपांडे व बाबुराव ठाकूर यानी महत्मा गांधींच्या आदेशानुसार बेळगावं परिसरात आंदोलन थांबविले. यावरून त्या दोघाना म.गांधी विषयी आदर होता हे दिसते.

..

असहकार आंदोलनात बेळगाव जिल्ह्यातील अनेकांनी भाग घेतल्यामुळे अनेकाना शिक्षा झाल्या होत्या [५१]. त्याचा तक्ता पुढीलप्रमाणे आहे:-

| क्र. | नाव | शिक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| १) | श्री. गंगाधरराव देशपांडे | ६ महिने |
| २) | श्री. दत्तोपंत मजली | १ वर्ष ६ महिने |
| ३) | श्री. केशवराव गोखले | १ वर्ष |
| ४) | श्री. धोंडो राजाराम ठाकुर | ३ महिने |
| ५) | श्री. शिवराम कोप्पळ | ३ महिने |
| ६) | डॉ. रामचंद्र जोशी ( पाच्छापूर ) | १ वर्ष |
| ७) | श्री. विश्वंभर रामचंद्र देशपांडे | १ वर्ष |
| ८) | श्री. हणमंत श्रीनिवास नाईक | १ वर्ष |

या प्रमुख व्यक्तिना वरीलप्रमाणे शिक्षा होऊन पहिल्या तिघाजणाना पुण्याच्या येरवडा तुरुंगात ठेवले होते, तर बाकीच्याना पोलिस हेड क्वार्टर्स जवळील सबजेलमध्ये ठेवले होते. तुरुंगातून सुटका होताच बाबुरावानी पुन्हा सक्रीय चळवळीत भाग घेतला. त्यानी कांग्रेसची पत्रके वाटणे, राष्ट्रसभा नेत्यांच्या व्याख्यानाची जाहिरात व सभेची व्यवस्था करणे, स्वयंसेवक म्हणून सर्व कामे करणे. हे कार्य राष्ट्रीय कार्य म्हणून ते करीत असल्याचे दिसते.

महमद अलीच्या नेतृत्वाखाली २८ डिसेंबर,१९२३ मध्ये काकीनाडा ( आंध्र प्रदेश ) येथे भरलेल्या कांग्रेसच्या वार्षिक अधिवेशनास उपस्थित असलेल्या बेळगांव परिसरातील स्वयंसेवकांच्या पथकाचे नेतृत्व बाबुरावाकडे सोपविण्यात आले होते [५२]. त्यानी ती जबाबदारी यशस्वीपणे पार .. पाडली.

## बाबुराव ठाकूर: १९२४ चे कॉंग्रेस अधिवेशन:

सन १९२१ पासून राष्ट्रीय घडामोडीत कर्नाटकला प्रांत म्हणून मान्यता [५३] मिळालेल्या या प्रांतात कॉंग्रेस सारख्या अखिल भारतीय स्वरूपाच्या महत्वाच्या संघटनेचे ३९ वे अधिवेशन कर्नाटक प्रांतात घेण्याचे, काकीनाडा ( २८ डिसेंबर,१९२३ ) च्या अधिवेशनात ठरले होते.

डिसेंबर १९२४ चे कॉंग्रेसचे अधिवेशन प्रथमच कर्नाटक प्रांतात भरणार असल्यामुळे योग्य जागेची निवड करण्यासाठी मार्च १९२४ मध्ये कर्नाटक प्रांत कॉंग्रेसची सभा हुबळी येथे आयोजित केली होती. त्यात अधिवेशनासाठी बेळगाव शहराची निवड करण्यात आली होती [५४]. या सभेस गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर, बेळगांवचे स्वयंसेवकासह हजर राहून अधिवेशनासाठी बेळगाव शहराची निवड केल्याबद्दल प्रतिनिधीचे उभयतानी आभार मानून सर्व व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले.

## अधिवेशनाची व्यवस्था :

अधिवेशनाच्या स्वागत समितीने बेळगांव शहराच्या बाहेर ८० एकराचे मैदान ( टिळकवाडी ) अधिवेशनासाठी निवडले होते. या मैदानास कर्नाटकच्या वैभवशाली विजयनगर साम्राज्याची आठवण लोकाना व्हावी म्हणून त्यास ' विजयनगर ' हे नाव देण्यात आले होते [५५]. ही नाव देण्याची कल्पना गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर यांचीच होती. यावरून ठाकूराना भारतीय इतिहासाचा अभ्यास व अभिमान, समयसूचकता होती हे दिसू येते.

स्वागत समितीने मैदानावर पेंडाल, गोपुरा, स्वदेशी वस्तूचे प्रदर्शन, स्वयंसेवक कक्ष, विषय कमिटी कक्ष, मार्गदर्शक स्वयंसेवक संघ, माईक, स्पीकर, वीज, निवास सोय, व्यासपीठ आदि उत्तम व्यवस्था केली होती.

..

पण खरा प्रश्न पिण्याच्या पाण्याचा होता. तो बाबुरावांच्या कल्पक बुध्दीने सुटला. अधिवेशनास येणाऱ्या राष्ट्रीय व प्रांतिय पातळीवरील नेत्याना व प्रतिनिधीना पाणी कमी पडू नये म्हणून विहीर काढण्याच्या बाबुरावांच्या कल्पनेस स्वागत समितीने मान्यता दिली व ही जबाबदारी बाबुरावांच्यावर सोपविली. त्यानी स्वयंसेवकांच्या मदतीने एक विहीर काढली. त्यास बाबुरावांच्या आग्रहास्तव " काँग्रेस विहीर " असे नाव देण्यात आले [५६]. त्या विहीरीचे उदघाटन महात्मा गांधीच्या हस्ते करण्यात आले.(कृपया नकाशा नं. २, पान १८४ पाहणे)

बाबुराव ठाकूर यानी अधिवेशन काळात स्वयंसेवक म्हणून उत्तम कामगिरी पार पाडल्याचे दिसते. एप्रिल १९२४ पासून डॉ.एस.एन.हार्डीकर यानी अधिवेशनासाठी स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली होती. स्वयंसेवकांची एकूण संख्या १,१५६ असून, त्यापैकी ८१७ सहायक, १४१ सहायिका ( स्त्री स्वयंसेवक ) आणि १९८ स्काउँट होते [५७]. स्वागत समितीने संपूर्ण स्वयंसेवकांचे नेतृत्व बाबुराव ठाकूर व शिवराम कोप्पळ यांच्यावर सोपविले होते [५८]. त्यानी अधिवेशन काळात दिवस - रात्रफिरून उत्तम व्यवस्था करून, स्वागत समितीने दाखविलेला विश्वास सार्थ करून दाखविला. जे राष्ट्रीय स्तरावरील पुढारी ( पं.नेहरू, स्वामी श्रध्दानंद इ.) अधिवेशनास हजर होते. त्यांची बाबुराव ठाकूरानी योग्य व्यवस्था करून देशसेवाच केली, राष्ट्रीय कार्य केले असेच म्हणावे लागेल.

दिनांक २६, २७ डिसेंबर,१९२४ रोजी बेळगाव येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म.गांधी व स्वागताध्यक्ष कर्नाटक सिंह गंगाधरराव देशपांडे होते. या अधिवेशनास एकूण १,८४४ प्रतिनीधी हजर होते [५९].

..

असहकार चळवळीनंतरचे बाबुराव ठाकूरांचे कार्य :

बाबुराव ठाकूर म.गांधींना आपला गुरू मानीत असत म्हणून त्यांचा प्रत्येक कार्यक्रम बेळगाव परिसरात ठाकूरांनी समर्थपणे राबविल्याचे दिसते. म.गांधींनी असहकार चळवळ बंद करून राष्ट्रीय कार्य म्हणून स्वदेशी, सुतकताई, खादीप्रसार, अस्पृश्योध्दार, हिन्दु-मुस्लिम ऐक्य इ. कार्य हाती घेऊन कॉंग्रेस स्वयंसेवकांना हे कार्य हाती घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमातही बेळगाव जिल्हा आघाडीवर होता. बेळगांव जिल्हा कॉंग्रेस कमिटीने स्वदेशी व खादीचा प्रचार केला. हिन्दु-मुस्लिम जमातीत ऐक्य निर्माण करण्यासाठी व अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर हाती घेतला. त्यात बाबुराव ठाकूर स्वयंसेवक म्हणून आघाडीवर होते [६०].

दरम्यान भारतीयांना स्वराज्याचे कोणते हक्क द्यावेत यासाठी नेमलेल्या " सायमन कमिशन " मध्ये ( नोव्हेंबर,१९२७ ) एकही भारतीय नाही, म्हणून राष्ट्रसभेने त्यावर बहिष्कार टाकल्याचे जाहीर करताच, गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर, अण्णुगुरूजी, शिवराम कोप्पळ इत्यादिनी बेळगाव जिल्हयात अनेक ठिकाणी बहिष्काराच्या सभा घेऊन [६१] सायमन कमिशन विरोधी भावना जनतेत निर्माण केली.

बाबुराव ठाकूरानी पूर्णवेळ कॉंग्रेससाठी देण्याचे ठरविले होते. कोणतेही आंदोलन जनशक्तिच्या पाठिंब्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही अशी ठाम भूमिका ठाकूरांची होती, म्हणून कॉंग्रेस तत्वाचा, कार्यक्रमाचा जनमानसात प्रसार करून त्याना राष्ट्रीय प्रवाहात सहभागी करून घेण्यासाठी साधन म्हणून वापरण्यासाठी बाबुराव ठाकूर यानी १ ऑगष्ट,१९२८ पासून " तरूण भारत " वृतपत्र साप्ताहिक पुन्हा सुरू केले [६२]. या वृतपत्रातून बाबुराव ठाकूर यानी कॉंग्रेस तत्वाचा व

..

कार्यक्रमाचा सतत प्रचार केल्यामुळे तरुण भारतचे ऑफिस कांग्रेस चळवळीचे केंद्र बनले. एवढेच नव्हे तर बाबुरावाना आंदोलनास चिथावणी देणाऱ्या लेखाबद्दल २,००० ( दोन हजार रुपये ) जामीन भरावा लागला [६३].

भारतीय स्वातंत्र्याच्या प्रत्येक आंदोलनात बाबुरावांचा सक्रीय सहभाग होता. महात्मा गांधीनी २६ जानेवारी,१९३० हा " स्वातंत्र्य दिन " साजरा करावा अशी घोषणा केली. तेंव्हा बाबुरावांनी स्वातंत्र्याच्या गुढ्या घरोघरी उभा करा [६४] असे आवाहन तरुण भारत वृतपत्रातून केले. एवढेच नव्हे तर जनतेने हा दिन मोठ्या प्रमाणावर साजरा करावा म्हणून गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर, बा.य.देशपांडे, पुंडलीकजी कातगडे, इत्यादिनी बेळगाव जिल्ह्यात अनेक ठिकाणी फिरुन व्याख्याने देऊन जनतेत जागृती केल्यामुळे जिल्हाभर यादिवशी " स्वातंत्र्य दिन " उत्साहाने साजरा करण्यात आला. तर बेळगाव शहरात २६ जानेवारी, या दिवशी गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर, अण्णु गुरुजी, शिवराम कोप्पळ इत्यादि नेते हजारो कांग्रेस कार्यकर्त्यासह मिरवणूकीने येऊन हुतात्मा चौकात स्वातंत्र्याचा ध्वज फडकावून हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले.हा दिन अत्यंत उत्साहाने व आनंदाने बेळगाव वासियांनी साजरा केला, त्यास ठाकूरांचे प्रयत्न कारणीभूत आहेत.

बाबुराव ठाकूर: सविनय कायदेभंग चळवळ:

सविनय कायदेभंग आंदोलन हा राष्ट्रसभेच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा होय. यातही ठाकूरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसते. गव्हर्नर जनरल आर्यविनने हिन्दुस्थानला वसाहतीचे स्वराज्य

देण्याचे आक्टोबर १९२९ मध्ये जाहीर केले होते, पण राष्ट्रसभेस पूर्ण स्वयाज्य हवे होते [६५]. याबाबत सरकार बरोबर तडजोड होईल असे म.गांधींना वाटल्याने त्यांनी गव्हर्नर जनरलला पत्र पाठविले होते. पण सरकारने त्याची दखल न घेता दडपशाही सुरु केली. तेंव्हा त्यास प्रत्यूत्तर म्हणून १४ जानेवारी,१९३० रोजी राष्ट्रसभेने म.गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळीचा आदेश देऊन [६६] हे आंदोलन मिठाचा कायदा मोडून करण्याचे ठरविले, कारण समुद्राच्या मोफत मिळणाऱ्या पाण्यापासून तयार होणाऱ्या मिठावर सरकारने अन्यायी कर लादला होता, म्हणून मिठाचा कायदा मोडण्यासाठी म.गांधी साबरमतीच्या आश्रमातून निघाले व ५ एप्रिल,१९३० रोजी दांडी येथे मिठाचा कायदा मोडला [६७].

सविनय कायदेभंग चळवळीत (१) मिठाचा सत्याग्रह (२) सरकारी शाळा महाविद्यालयावर, कोर्ट, कचेरीवर बहिष्कार (३) परदेशी मालाची होळी (४) दारू दुकानावर निरोधने करणे (५) कर न देणे इ. [६८] गोष्टी करण्याचे म.गांधींनी आदेश दिला होता.

यावेळी बाबुराव ठाकूर बेळगाव जिल्हा कॉंग्रेसचे चिटणीस होते [६९]. तेंव्हा बेळगाव जिल्ह्यात आंदोलन सुरु होण्यापूर्वी बाबुराव ठाकूर व पुंडलीकजी कातगडे यांनी फिरून, सभा घेऊन जिल्ह्यात आंदोलनाचा कार्यक्रम सांगून, जागृती निर्माण केली होती. तसेच बेळगांव जिल्ह्यात हे आंदोलन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी बाबुराव ठाकूरांनी आपल्या संघटन कौशल्याच्या बळावर कार्यकर्त्यांचे विभागवार गट पाडून त्यांना खालीलप्रमाणे कामे विभागून दिली होती [७०].

| क्र. | प्रचाराचे क्षेत्र | | गटनायकाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | बेळगाव शहर | .. | १) बाबुराव ठाकूर |
| | | .. | २) शिवराम कोप्पळ |
| | | .. | ३) डॉ.कौवाडकर |
| २) | बेळगाव - निपाणी मार्ग | .. | १) श्री.वामनराव बिद्री |
| ३) | बेळगाव - नेसरी - थरगट्टी | . | १) श्री.रामचंद्र वडवी (मास्तर) |
| ४) | बेळगाव - बैलहोंगल-सौंदत्ती | . | १) श्री.बा.य.देशपांडे |
| ५) | बेळगाव - चंदगड मार्ग | .. | १) श्री.कृष्णाराव वैद्य |

यावरुन बाबुराव ठाकूरांचे संघटनात्मक कौशल्य दिसू येते. तसेच मार्केट यार्ड चौकात ( बेळगाव ) गंगाधरराव देशपांडे यानी कर न भरलेले मिठ विकले व ते नारायण जोशी, जीवनराव याळगी यानी विकत घेतल्याबद्दल त्याना अनुक्रमे एक वर्ष व बाकीच्याना २ महिन्याची शिक्षा सिटी मॅजिस्ट्रेट श्री. नाडिक यानी ठोठावल्या [७१].

या आंदोलन प्रसंगी बाबुराव ठाकूर, शिवाराम कोप्पळ, वामनराव सावंत इत्यादिनी बेळगाव शहरात प्रभात फेऱ्या, मिरवणूका, झेंडावंदन आदी कार्यक्रम पार पाडले. तसेच या आंदोलनाची तीव्रता वाढविण्यासाठी बाबुरावानी " काँग्रेसला सहकार्य करा, तरुणांची ताकद " या मथळयाखाली तरुण भारतमध्ये लेख लिहून, तसेच अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन वातावरण तप्त केले. त्यामुळे बेळगाव जिल्हयात अनेकांनी आंदोलनात भाग घेतला म्हणून जिल्हयातील पक्क्या सत्याग्रहीची संख्या ७२५ च्या वर असून बरेच कच्चे कैदी होते [७२]. त्याना हिंडलगा जेल मध्ये ठेवले होते.

..

बाबुराव ठाकूर, शिवराम कोप्पळ, डॉ.कोवाडकर यानी हिंडलगा जेल समोर दिनांक १८-४-१९३० रोजी सभा घेऊन प्रक्षोभक भाषणे केली होती, म्हणून सरकारने त्याना अटक करून दिनांक २२-४-१९३० रोजी कोर्टापुढे हजर करताच सिटी मॅजिस्ट्रेटनी त्याना सहा महिन्याची शिक्षा ठोठावली [७३]. बाबुराव त्यांच्या कार्यामुळे प्रसिध्दीस आले होते. म्हणून ज्यादिवशी बाबुरावाना शिक्षा झाली त्यादिवशी बेळगावातील तरूणांनी त्यांच्या अभिनंदनासाठी सभा घेतली होती. बाबुराव ठाकूरांच्या सततच्या प्रेरणेमुळे व प्रयत्नामुळे बेळगाव शहरात पुरूषाप्रमाणे १९३० च्या आंदोलनात सौ.शांताबाई कोप्पळ, सौ. लक्ष्मीबाई सोहनी, सौ.रमाबाई याळगी, सौ.सुभद्रा दातार आदि स्त्रियानी भाग घेतल्याचे दिसते [७४].

दिनांक ७-१०-१९३० रोजी बाबुराव ठाकूर प्रभृतींची हिंडलगा जेलमधून सुटका होताच, बेळगावातील तरूणांनी त्यांची मिरवणूक काढून भव्य सत्कार केला [७५]. या तुरूंगवासामुळे बाबुरावांची बेळगाव परिसरातील महत्वाच्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांत व स्वातंत्र सेनानीत गणना होऊ लागली.

पुढे गांधी - आर्यर्विन करार ( १९३१ ) संपुष्टात आल्यानंतर म.गांधीनी ३ जानेवारी,१९३२ मध्ये पुन्हा कायदेभंग चळवळीचा आदेश [७६] देताच बेळगाव शहरात चळवळीचा पुन्हा डोंब उफळला, चळवळ उग्र बनली. बाबुरावानी जानेवारी १९३२ मध्ये बेळगाव शहरात सभा घेऊन स्वदेशी, बहिष्कार व कर न देणे या गोष्टी जनतेने कराव्यात असे आवाहन केले. या परिसरातील सविनय कायदेभंग आंदोलक म्हणून बाबुरावावर ब्रिटीश सरकारची नजर होतीच. कायदेभंगाची चळवळ सुरू होताच, दररोज सिटी पोलिस स्टेशनमध्ये हजेरीची नोटीस बाबुरावाना दिली. पण त्यानी तो आदेश जुमानला नाही. परिणामत: त्याना परत एकदा अटक होऊन एक वर्षाची शिक्षा झाली [७७]. बाबुरावाना प्रथम हिंडलगा जेलमध्ये

..

व नंतर नासिक जेलमध्ये त्यांची रवानगी करण्यात आली. पण त्यांच्या अटकेमुळे बेळगावातील कायदेभंग चळवळ थंडावली नाही, कारण तरुण विद्यार्थी कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यात बाबुराव यशस्वी झाले होते.

म.गांधींनी अस्पृश्यता निर्मुलनाचा सामाजिक कार्यक्रम त्यांच्या राजकीय कार्यक्रमाचा एक भाग म्हणून अंगिकारला होता. बाबुरावांनी मुख्यत्वे करून १९३३ मध्ये सामाजिक कार्यक्रम राबविण्यावर भर दिला. या संदर्भात चंदगड तालुक्यात त्यांनी फारमोठी मोहिम हाती घेऊन रस्ते, गटारे तयार करणे, विहीरी खोदणे या नागरी कार्यक्रमाबरोबर हरिजन मंदिर प्रवेश, संडास सफाईचे सामाजिक कार्यक्रम बेळगावात राबविले [७८].

कौन्सिल निवडणुका : बाबुराव ठाकूर :

कॉंग्रेस पक्षाने राजकीय आंदोलनाचा भाग म्हणून अनेक वर्षे कौन्सिल ,असेंब्ली विडणूकीवर बहिष्कार टाकला होता. पण सन १९३४ च्या निवडणुकीत कॉंग्रेसने भाग घेण्याचे ठरविले. दक्षिण विभागातील (१) बेळगाव (२) धारवाड (३) कारवार (४) विजापूर (५) रत्नागिरी (६) कुलाबा या जिल्हयासाठी एक प्रतिनिधीची तरतूद होती. दि.१४-११-३४ रोजी निवडणूक झाली. त्या जागेकरिता कॉंग्रेस पक्षाने हावेरीचे प्रसिध्द वकील श्री. सिद्दाप्पा होसमनी याना उमेदवारी दिली [७९]. त्यांची मुख्य लढत ब्राम्हणेत्तर पक्षाचे धारवाडचे रावबहादूर श्री.बी.एल.पाटील व डेमॉक्रेटिक पक्षाचे श्री.विठ्ठलराव जोग यांच्याशी होती. यावेळी ब्राम्हणेत्तर पक्षाने आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे ही निवडणूक अटीतटीची झाली. पण गंगाधरराव देशपांडे व बाबुराव ठाकूर यांच्या अविरत प्रयत्नामुळे कॉंग्रेस उमेदवार होसमनी प्रचंड मताच्या फरकाने विजयी झाले [८०]. बेळगाव

..

जिल्हयात एकूण ४,५४५ मतापैकी हौसमनी याना ३,३३२, श्री.पाटील याना ५८३ व श्री.जोग याना ६३० मते मिळाली [८१]. ॲड.हौसमनीचा विजय हा ख-या अर्थाने गंगाधरराव देशपांडे व बाबुरावांच्या बेळगाव जिल्हयातील कार्याचा विजय आहे.

तसेच सन १९३५ च्या बेळगाव म्युनिसिपल कौन्सिलच्या निवडणुकीत ३२ सभासदापैकी १२ सभासद उभे करून आठ निवडून आणाले [८२]. तर १९४२ च्या जिल्हा लोक बोर्डाच्या निवडणूकीत एकूण ३८ पैकी अठ्ठावीस उमेदवार निवडून आणाले [८३].

## कॉंग्रेस सुवर्णमहोत्सव :

दिनांक २८ डिसेंबर,१९३५ रोजी कॉंग्रेसला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याने देशातील विविध भागात सुवर्णमहोत्सव साजरा झाला. बाबुराव बेळगाव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सचीव होते, त्यांच्या मार्गदर्शनाखाली (१) प्रभात फेरी (२) झेंडावंदन (३) मिरवणूक (४) जाहिर सभा (५) राष्ट्रीय निशाणाची व स्वदेशी वस्तुंची विक्री इ. कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित करून कॉंग्रेसचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला [८४] त्यासाठी बाबुरावानी विशेष परिश्रम घेतले होते.

## बाबुराव ठाकूर : ब्राम्हणोत्तर पक्ष :

दक्षिण भारतात ब्राम्हणोत्तर पक्षाला व्यापक पाठींबा होता. बेळगावचा सुध्दा यास अपवाद नव्हता. बेळगाव जिल्हयातील ब्राम्हणोत्तर पक्षाचे नेतृत्व अण्णासाहेब लठ्ठे यांच्याकडे होते. ते जिल्हा स्कूल बोर्ड, जिल्हा लोकल बोर्ड व बेळगाव म्युनिसिपालटीचे अनेकवेळा सरकार नियुक्त सभासद बनले होते [८५]. सामान्यत: ते कॉंग्रेस व कॉंग्रेस कार्यक्रमास सातत्याने विरोध करीत असत. त्यामुळे त्यांचे कॉंग्रेस नेत्याबरोबर कधीच जमत नव्हते. बाबुराव ठाकूर सुध्दा ' तरूण भारत ' मधून अण्णासाहेब लठ्ठेवर तोफा

..

डागत असत [८६]. कॉंग्रेस व ब्राम्हणेत्तर पक्षात समझोता झाल्यास स्वातंत्र्य चळवळीस अधिक धार येईल याहेतूने बाबुरावानी आपला लठ्ठे विरोध कमी केला व लठ्ठेना कॉंग्रेसमध्ये आणण्याचे प्रयत्न सुरु केले. सुदैवाने बाबुरावांचे बंधु यशवंतराव व अण्णासाहेब लठ्ठे व्यवसाय मित्र ( वकील ) असल्याने दोघात घनिष्ठ संबंध होते. याचा फायदा बाबुरावानी घेतला व लठ्ठेना कॉंग्रेसमध्ये येण्याकरिता मन वळविले. तेंव्हा १ आक्टोबर,१९३६ मध्ये डॉ. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मारुतीच्या मंदिरात भरलेल्या सभेत अण्णासाहेब लठ्ठे यानी ५०० ब्राम्हणेत्तर पक्षाच्या कार्यकर्त्यांसह कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला [८७]. अण्णासाहेब लठ्ठे बहुजन समाजाचे पुढारी असल्याने त्यांच्या प्रवेशामुळे कॉंग्रेसचे वजन व व्याप्ती वाढली हे निश्चित.

पुढे इ.स.१९३७ च्या मुंबई विधी मंडळाच्या निवडणूकीत अण्णासाहेब लठ्ठेना उत्तर बेळगाव मतदार संघातून उमेदवारी दिली, त्याना विजयी करण्यासाठी गंगाधरराव देशपांडे, बाबुराव आदि कॉंग्रेस नेत्यानी खुप परिश्रम घेतल्यामुळे ते निवडून आले व पुढे खेर मंत्री मंडळात ( मुंबई राज्य, १९३७ ) अर्थमंत्री झाले [८८].

## बाबुराव ठाकूर : कॉंग्रेस रोड :

सन १९३८ पर्यंत बेळगाव जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर सरकार धार्जिनांचे ( सरकार निष्ठ ) वर्चस्व व ताबा होता. त्यामुळे त्यांचे मुख्य कार्य म्हणजे सरकारी अधिका-यांची खुशामत करणे व कॉंग्रेसला विरोध करणे हे होते. पण त्यांच्या या लाळ घोटेपणास राष्ट्रीय वृतीचा अपमान म्हणून बाबुराव " तरुण भारत " मधून कडाडून विरोध करीत असत [८९]. या संदर्भात बेळगाव शहरातील बेळगाव ते ठळकवाडी याना जोडणारा रेल्वे लाईनशी समांतर जाणारा जो "कॉंग्रेस रोड " आहे याची कथा खूपच बोलकी आहे.

..

दिनांक २६-१०-१९३४ रोजी नेक नामदार ब्रेबोर्न, राज्यपाल,मुंबई, बेळगावला भेट देणार होते. तेंव्हा बेळगाव ते ठळकवाडी या रस्त्याचे उदघाटन नेक नामदार ब्रेबोर्न यांच्या हस्ते करण्याचे व त्या रस्त्यास ब्रेबोर्न नाव देण्याचा ठराव तारीख १८-८-१९३४ च्या मुनिसिपालटीच्या सभेत मांडला व एकूण २८ सभासदापैकी १८ विरूध्द पाच मतानी पास झाला, पाच सभासद तटस्थ राहिले [१०]. पण त्याच दिवशी " मारूतीच्या मंदिरात " नागरिकांची सभा श्री.मसूर यांच्या अध्यक्षतेखाली होऊन त्या रस्त्यास ब्रेबोर्न नाव देण्यात येवू नये म्हणून ठरविले, त्याच राजनिष्ठांचे हे कारस्थान हानून पाडावे असे आवाहान बाबुराव ठाकूर यानी केले [११]. पण राजनिष्ठा सभासदांनी कॉंग्रेसचे न ऐकता या नव्या रस्त्यास दोन बाजूना ( टोकाना ) " ब्रेबोर्न रोड " नावाच्या पाटयाही लावल्या. तेंव्हा राजनिष्ठांच्या डाव हाणून पाडण्यासाठी दिनांक २२-१०-१९३४ रोजी बाबुराव ठाकूर, शिवराम कोप्पळ, दामोधर रामप्पा कनगोळकर, जुवेकर यानी आपल्या सह्यानिशी खालील जाहिरात प्रसिध्द केली [१२].

> " .. नव्या रस्त्यास कॉंग्रेस रोड नाव देण्यासाठी दिनांक २२-१०-१९३४ रोजी सायंकाळी ६ वाजता कॉंग्रेस विहीरीजवळच्या रेल्वे फाटका समोरील मैदानात जाहीर सभा होणार आहे. तरी सर्वांनी अगत्याने हजर रहावे .."

ही जाहिरात गावात वाटताना कृष्णा हणमशेठ या मुलास पोलिसानी अटक केली. पण ता.२१-१०-१९३४ रोजी रात्री बाबुराव ठाकूर व कुंठणकर बा.रं. यानी " ब्रेबोर्न रोड " पाटयावर डांबर फासून नाव पुसून टाकले [१३].

वरील दोन घटनामुळे पोलिसानी चिडून " मुंबई पोलिस अॅक्टच्या " ४८ (अ) व ६१ (ब) कलमाखाली, पोलिस परवानगी शिवाय सभा घेता येणार नाही [१४] असे जाहीर केले व सभा होऊ नये म्हणून चोख पोलिस

..

बंदोबस्त ठेवला होता. पण तारीख २३-१०-१९३४ रोजी संध्याकाळी पोलिसाना चुकवून बाबुराव ठाकूर, शिवराम कोप्पळ, जुवेकर यानी २७ लोकासमोर सभेस सुरूवात केली [९५]. इतक्यात पोलिसानी सभेस गराडा घातला. पोलिस सब इन्स्पेक्टर श्री. पै व श्री.मुधोळकर यानी सभेस हरकत घेतली. तरीही त्यानी सभा चालूच ठेवली. तेंव्हा दोधात झालेल्या हिसका हिसकीत बाबुराव ठाकूर यांच्या नाकाला जबर मार लागून रक्त वाहू लागले. पोलिसानी त्याना अटक करून कोर्टात खटला दाखल केला. तेंव्हा पासून या रस्त्यास " काँग्रेस रोड " नाव रूढ झाले [९६]. हा खटला खूपच गाजला. ( कृपया नकाशा१पहाणे पान१८४ वर ).

काँग्रेस रोड खटला बेळगाव कोर्टात दाखल :

पुढे पोलिसानी कॅन्टोनमेंट मॅजिस्ट्रेट राव ब.श्री.एस.बी.पाळेकर यांच्या कोर्टात मुंबई पोलिस ॲक्ट कलम ६५ (ब) व ६८ (क) प्रमाणे बाबुराव ठाकूर, शिवराम कोप्पळ, जुवेकर यांचेवर खटला दाखल केला. सदर खटल्याचा निकाल दिनांक २९-१२-१९३४ रोजी न्यायमूर्तींनी जाहीर करून आरोपीना ६५ (ब) कलमाखाली गुन्हा केला नाही म्हणून क्रि.पो. कोड कलम २४५ खाली निर्दोष म्हणून जाहीर केले, पण ६८ (क) प्रमाणे आरोपी दोषी आहेत, म्हणून प्रत्येकास रू.५ दंडाची शिक्षा सुनावली [९७]. याविरूध्द बाबुरावानी सेशन कोर्टात अपील केले, पण हे अपील सेशन जज्ज श्री.ओक यानी नामंजूर केले [९८]. तेंव्हा सदर खटल्यात झालेला रू.५ दंड रद्द करून घेण्यासाठी " काँग्रेस रोड " खटला हायकोर्टात दाखल केला. तेथे ते निर्दोष सुटले [९९]. हायकोर्टात बाळासाहेब खेर ( पुढे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बनले ) व के.एम.मुन्सी ( गृहमंत्री, मुंबई राज्य ) यानी बाबुराव ठाकूर यांच्यावतीने काम पाहिले. दरम्यान बाबुरावानी बेळगाव कोर्टात अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला.

..

एक हजार रुपयाचा पोलिस व सरकारवर दावा दाखल:

बाबुराव ठाकूर प्रभृतीने आपणास केलेली अटक व पोलिसांनी केलेली हिसका हिसकी बेकायदेशीर होती, म्हणून सिव्हिल प्रोसीजर कोडच्या ८० व मुंबई पोलिस ॲक्ट ८० कलमाखाली बेळगाव फर्स्ट क्लास मैजिस्ट्रेट श्री.आराणासाहेब यांच्या कोर्टात ( १ ) सेक्रेटरी ऑफ स्टेट (२) फौजदार मुधोळकर व (३) हवालदार अब्दुला यांचे विरूध्द एक हजार रुपये अब्रु नुकसानीचा दावा दाखल केला. सदर दाव्याचा निकाल दिनांक २९-८-१९३८ रोजी न्या. आराणानी जाहीर केला. त्याप्रमाणे हवालदार अब्दुलाने वादीस नुकसान भरपाई दाखल रु.१ व वादीचा कोर्ट खर्च द्यावा, पण श्री.पै व मुधोळकरना निर्दोष सोडले [१००].

बाबुराव ठाकूर: १९३८ चे काँग्रेस हरिपूर अधिवेशन:

गुजराथ मधील हरिपूर येथे १९३८ चे काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. या अधिवेशनास बेळगाव मधून दोन प्रतिनिधी पाठविण्याचे ठरले होते. पण कोणते पाठवावेत याबाबत मतभेद निर्माण झाले. त्यामुळे निवडणूक घ्यावी लागली. तारीख ३१-१-१९३८ रोजी प्रतिनिधी निवडीसाठी मतदान होऊन त्यात बाबुराव ठाकूर व जीवनराव याळगी प्रचंड मतानी निवडून आले [१०१]. हरिपूर अधिवेशनास ( दिनांक १९,२० व २१ फेब्रुवारी,१९३८ ) बाबुराव ठाकूर व जीवनराव याळगी उपस्थित राहिले. परत आल्यानंतर बेळगाव नागरिकांनी त्यांचा मारुतीच्या मंदिरात भव्य सत्कार केला [१०२]. याप्रसंगी तरुणांनी राष्ट्रीय कार्यास वाहून घ्यावे, देश बलवान करावा असे उपदेशात्मक भाषण केले.

## बाबुराव ठाकूर : १९४२ चे चलेजाव आंदोलन :

१९४२ चे चलेजाव आंदोलन भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील निर्णायक अंतीम टप्पा होता. ब्रिटिश सरकारने कॉंग्रेस अथवा भारतीयाना विश्वासात न घेता भारत दोस्त राष्ट्राच्या बाजूने दुसऱ्या महायुध्दात उतरले असल्याची ब्रिटिश सरकारची घोषणा, या विरोधात कॉंग्रेस मंत्रिमंडळाने सादर केलेले निषेधपर राजीनामे, दोस्त राष्ट्रांचा सातत्याने होत असलेला पराभव, जपानचा वरचष्मा, या पार्श्वभूमीवर क्रिप्स मिशनचे अपयश या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस वर्किंग कमिटीची तारीख ३०-४-१९४२ रोजी अलाहाबाद येथे भरलेल्या सभेत इंग्लड युध्द काळात भारताचे रक्षण करण्यास असमर्थ असल्याने त्यांनी भारत सोडून जावे [१०३] असा ठराव पास केला. या संदर्भात ८ ऑगष्ट,१९४२ रोजी मुंबईत गवालिया टॅंकवर भरलेल्या कॉंग्रेस महासमितीच्या बैठकीत ' चले जाव ', ' छोडो भारत ' चा ठराव पास केला [१०४]. पण सरकार सावध होते. आंदोलकाना कोणतीच संधी देण्याची नाही म्हणून ८ ऑगष्टच्या रात्री सर्व प्रमुख नेत्याना अटक करून आंदोलनाचे राजकीय नेतृत्व काढून घेतले.

या ऐतिहासिक सभेस बाबुराव ठाकूर व वामनराव सावंत ( संपादक, लोकमत, बेळगाव ) हजर होते [१०५]. सरकारने धरपकड करताच ते दोघे लपत छपत बेळगावला आले. प्रवासाच्या दगदगीने बाबुराव आजारी पडले. तेंव्हा सरकार आपणास घरी ठेवणार नाही म्हणून ते आपल्या मामाच्या नानावडी ( चंदगड तालुका ) येथे जाऊन राहिले [१०६]. सरकारने गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर, वामनराव सावंत, राघवेंद्र मंडगी इ. ना भारत संरक्षण कायद्याखाली ' डेटिन्यू वारंट ' काढले. बाबुरावाचा आजार वाढला व यासमयी त्यांची छोटीशी शस्त्रक्रिया डॉ.हेरवाडकरानी केली व विश्रांतीचा सल्ला दिला [१०७]. याचवेळी सरकारने गॅझेट काढून तारीख २१-९-१९४२ च्या आत हजर व्हावे असा समन्स बाबुरावाना दिला.

..

आपण आजारी आहोत असे सांगूनही तारीख २१-९-१९४२ रोजी सब इन्स्पेक्टर दोड्डामननी त्याना अटक करून हिंडलगा जेलमध्ये स्थानबद्दल केले [१०८]. तेथून त्याना नासिक ( महाराष्ट्र ) च्या तुरूंगात रवाना केले. नासिक तुरूंगातून मे,१९४४ मध्ये त्यांची मुक्तता करण्यात आली [१०९].

चलेजाव चळवळ प्रसंगी बेळगावातील प्रमुख नेत्याची सरकारने धरपकड केली. तरीही विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजवर बहिष्कार टाकला. बेळगावकरानी शहरातील सर्व व्यवहार स्वयंस्फूर्तीने बंद ठेवले. तारीख ११-८-१९४२ रोजी बेळगावातील जनतेने, विद्यार्थ्यांनी १० हजाराचा प्रचंड मोर्चा काढून " ब्रिटीशानो चालते व्हा " अशा घोषणा दिल्या. शेवटी विद्यार्थ्यांची शहापूर, ठळकवाडी व मारूतीच्या देवासमोर सभा घेण्याचा प्रयत्न पोलिसानी उधळून लावला [११०], म्हणून श्री. नाथ पै, श्री.गजाननराव याळगी, आबासाहेब देशपांडे, गोविंद कारेकर, गोविद जोशी आदि विद्यार्थ्यांनी मिळून ठळकवाडी पोलिस स्टेशन तारीख १०-३-१९४३ रोजी जाळले [१११]. त्यांच्यावर पोलिसानी पोलिस स्टेशन जळीताचा खटला दाखल केला, पण डिस्ट्रक्ट जज्ज श्री.लाड यानी पुराव्या अभावी त्यांची निर्दोष मुक्तता केले [११२].

या चळवळीत जिल्हयातील विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी टेलिफोन तारा तोडणे, रेल्वेचे रूळ उखडणे, रस्त्याचे पूल पाडणे, तेथे धोक्याचे लाल निशान लागणे, चावडी, पोलिस स्टेशन, सरकारी डाक बंगले, पोस्ट ऑफिस जाळणे, टपाल लुटणे, सरकारी कचेरीतील कागदपत्रे नाहीशी करणे, पोलिसांचा गणवेश व बंदुका काढून घेणे, खजिना लुटणे इ. विध्वंसक गोष्टी केल्या. परिणामत: सरकारने गोकाक ते बेळगाव व बेळगाव ते लोंढा हा भाग धोक्याचा भाग (Danger zone ) म्हणून जाहिर केला [११३].

स्वातंत्र्य सैनिकाच्या मागचा पोलिसांचा पाठलाग कमी व्हावा म्हणून त्यांनी अनेक युक्त्या लढविल्या. कापडी पिशवीत कांहीतरी ठेवून अथवा काचेच्या बाटलीत कांहीतरी ठेवून त्यावर गुलाल अथवा आंब्याच्या डाहळ्या टाकून " धोका - बॉम्ब " आहे असे फलक लावून पोलिसांचा पाठलाग चुकवत असत [११४].

बेळगावात बॉम्ब तयार करण्याचा कारखाना क्रांतीकारकानी काढला होता. तारीख २३ नोव्हेंबर,१९४२ रोजी गोंधळी गल्लीत बॉम्ब तयार करताना श्री.शंकर ढग ( बेनाडीकर ) व श्री. आण्णाप्पा चौगुले याना पोलिसानी पकडले होते, त्याबाबत त्याना दीड वर्षाची शिक्षा झाली होती [११५].

ही चळवळ आटोक्यात यावी म्हणून पोलिसांनी अन्ववीत अत्याचार, गोळीबार, लाठीमार केला. अनेकाना " मरमाप्पा " दाखविला ( मरमाप्पा: चामड्याच्या ओल्या पट्ट्याने कुल्ल्यावर मारणे ) तरीही कार्यकर्ते मागे हटले नाहीत, उलट त्यानी चळवळ तीव्र केली, म्हणून पोलिसांच्या मदतीला सरकारने बेळगाव जिल्ह्यातील गुर्लहोसून, पाच्छापूर, बैलहोंगल, कित्तूर या ठिकाणी तर धारवाड जिल्ह्यातील धारवाड, हावेरी, अळणावर, गदग या ठिकाणी मिलिटरी पाठविली [११६]. तरीही जनआंदोलनाची तीव्रता कमी झाली नाही. तेंव्हा यावर विचार विनिमय करण्यासाठी सर रोजर लुम्ले ( मुंबईचे राज्यपाल ) बेळगावला आले असता त्यानी पोलिसाना सडसावले ( जानेवारी,१९४४ )[११७]. परंतु गंगाधरराव देशपांडे व बाबुरावानी जी प्रेरणा जनतेत निर्माण केली होती, त्यामुळे पोलिसानां ही चळवळ दडपून टाकणे अवघड झाले होते. ही जळवळ दबली जात नव्हती.

..

बाबुराव ठाकूर : स्वातंत्र्यदिन :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीची यशस्वी फलश्रुती १५ ऑगष्ट,१९४७ रोजी झाली. यादिवशी ब्रिटिशानी भारतास स्वातंत्र्य देण्याचे जाहीर करताच हा दिवस बेळगाव जिल्हयात अत्यंत उत्साहाने, आनंदाने व वैभवाने साजरा करावा म्हणून बाबुराव ठाकूर, जीवनराव याळगी, वामनराव सावंत, बा.य.देशपांडे इ.नेते रात्रंदिवस फिरून पुढील गोष्टी करण्याचे आवाहन करीत होते [११८].

१) प्रत्येक गावात हा उत्सव आनंदाने साजरा करावा.
२) हा दिवस राष्ट्रीय उत्सव म्हणून सर्वांनी अभिमानाने साजरा करावा.
३) जनता व सरकारी अधिकारी यानी मिळून हा दिन साजरा करावा.
४) घरोघरी स्वातंत्र्याच्या गुडया उभाराव्यात.
५) जिल्हा कचेरीवर तिरंगा राष्ट्रध्वज फडकवावा.

बाबुराव ठाकूर: हुतात्मा स्मारक :

बेळगाव जिल्हयात स्वातंत्र्य उत्सव समिती निर्माण केली होती. तिचे चिटणीस स्वत: बाबुराव होते [११९]. दिनांक १५-८-१९४७ रोजी बेळगावकरानी प्रथम मिरवणूकीने जाऊन कमिशनर कचेरीवर ध्वजारोहन केले. मिरवणूक " बारागडयाच्या " विहिरीजवळ आली. तिथे तिचे सभेत रूपांतर झाले. गंगाधरराव देशपांडे, बाबुराव ठाकूर, श्रीरंग कामत, वामनराव सावंत याची समयोचित भाषणे झाली. बाबुराव ठाकूर यांच्या योजनेप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्म्यांचे स्मरण बेळगांवकराना

..

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कायम रहावे म्हणून " बारागड्याच्या " विहिरीसमोर हुतात्मा स्मारक स्तंभ गंगाधरराव देशपांडे यांच्या हस्ते उभा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबुराव ठाकूर होते [120]. तेंव्हा पासून या चौकास " हुतात्मा चौक " नाव रूढ झाले.

अशाप्रकारे बाबुरावांनी असहकार चळवळीपासून स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय प्रवेश केला. कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी या नात्याने, कट्टर देशभक्त, राष्टाभिमानी, स्वातंत्र्य सेनानी या नात्याने त्यानी अविरत परिश्रम घेतले. बेळगाव परिसरात कॉंग्रेस प्रणीत स्वातंत्र्य चळवळीस दिशा लावण्यास त्यांचा हातभार लागला. स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणापेक्षा ते वृत्तपत्र क्षेत्रात अधिक रममान झाले. सन १९५५ नंतर भाषावर प्रांत रचनेमुळे सीमा प्रश्नाची ( महाराष्ट्र - कर्नाटक ) सुरूवात झाली. बाबुराव पर्यायाने त्यात ओढले गेले व स्थानिक राजकारणास नवीन दिशा मिळाली. सीमावादाने उचल घेताच पुन्हा बाबुरावांनी स्वत:स राजकारणात झोकून दिले.

-000-

## संदर्भ सूची


१) तर्कतीर्थ जोशी, लक्ष्मणशास्त्री, प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, खंड ११ वा, १९८२, पान ८४५.

२) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.११-२-१९५०, पान १.

३) बेनेटॉन, विलीयम, प्रकाशक, एनसायक्लोपिडीया ब्रिटानिका युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो, लंडन, टोकिओ, इंग्रजी, खंड, ३, १९६८, पान ४१४.

४) कित्ता:

५) कित्ता:
अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.११-२-१९५०, पान २.

६) कित्ता:

७) कातगडे, पुंडलीकजी, दे.म.गोविंदराव व्यंकटेश याळगी यांचे चरित्र, मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई ४, ता.२४-२-१९६५, पान ३३.

८) कित्ता: पान ३८.

९) कित्ता: पान ७५.

१०) कित्ता: पान ३६.

११) कित्ता: पान ७७.

१२) कित्ता: पान २४.

१३) देशपांडे, बा.य., बेळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, बेकॉप प्रिंटर्स, बेळगाव, मराठी, १९७८, पान ३४.

१४) कातगडे,पुंडलीकजी, उपरोक्त, पान ४१-४२.

१५) बापट,पा.म.,प्रस्तावना, दे.म.गोविंदराव व्यंकटेश याळगी यांचे चरित्र, ता.२४-२-६५, पान ११.

१६) (अ) सौ॰ ठाकूर,स्नेहलता, मुलाखत.

१६) (ब) कित्ता:

१६) (क) सौ.प्रभु,प्रिया, समरांगण हे जीवन ज्यांचे, तरुण भारत प्रेस, बेळगाव, मे १९७५, पान २.

१७) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.५-१-१९४७, पान १.

१८) कित्ता:

१९) कित्ता: पान २.

२०) कित्ता:

२१) कित्ता: पान १.

२२) सौ.प्रभु,प्रिया, उपरोक्त, पान ३-४.
राजाध्यक्ष,ग.गो., बाबुरावांचे कार्य, साप्ताहिक वीरवाणी, बेळगाव, ता॰३०-९-१९४२, पान २.

२३) सौ.सातोस्कर,अनघा, काकांच्या आठवणी, स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकूर स्मृतिदिन विशेषांक, ता.२३-४-८२, पान २०.
सौ. प्रभू,प्रिया, उपरोक्त, पान ४-८.

२४) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२०-१-१९४८, पान ४.

२५) स्वातंत्र्यदिन विशेषांक, तरुण भारत, बेळगाव, ता.१५-८-१९४७, पान १५.

२६) सौ. प्रभू,प्रिया, उपरोक्त, पान ५.

..

२७) कित्ता: पान ७.

२८) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान २१.

२९) साप्ताहिक, बेळगाव समाचार, बेळगाव, ता.४-८-१९१९, पान २.
राजाध्यक्ष, ग.गो., बेळगाव जिल्ह्यातील ज्ञानगंगेचे उगमस्थान,
दैनिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२५-१०-१९६८, पान २.

३०) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान १.

३१) कित्ता: सप्टेंबर, १९२४, पान ४७८

३२) याळगी, विठलराव, कर्मयोगी बाबुराव, स्मृतिसुगंध? कै. बाबुराव
ठाकूर तृतीय स्मतिदिन विशेषांक, ता.२३-४-८२, पान १७.

३३) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२०-१-१९४८, पान ४.

३४) कित्ता: स्वातंत्र्यदिन विशेषांक, तरूण भारत, बेळगाव,
ता.१५-८-१९४७, पान १५.

३५) मासिक, लोकमान्य टिळक विशेषांक, तरूण भारत, बेळगाव,
नोव्हेंबर १९२०, पान २०.

३६) देशपांडे, बा.य., उपरोक्त, पान ३९.

३७) साप्ताहिक, स्वातंत्र्यदिन विशेषांक, तरूण भारत, बेळगाव,
ता.१५-८-१९४७, पान ४.

३८) डॉ.प्रसाद, राजेंद्र, लिगसी ऑफ महात्मा गांधी, शिवलाल
आगरवाल अॅन्ड को. (प्रा.) लि., आगरा, प्रथम आवृती,
इंग्रजी, १९६२, पान २८.

३९) कित्ता: पान ३०.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

४०) स्वातंत्र्यदिन विशेषांक, तरुण भारत, बेळगाव, ता.१५-८-४७, पान १५.

४१) सौ.प्रभू, प्रिया, उपरोक्त, पान १६.

४२) किता: पान १६-१७.

४३) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१९-२-१९३५, पान ५.

४४) सौ.प्रभू, प्रिया, उपरोक्त, पान १८.

४५) किता: पान १९.

४६) किता: पान २१.

४७) कातगडे,पुंडलीकजी, उपरोक्त, पान १७६.

४८) किता: .

४९) देशपांडे,बा.य., उपरोक्त, पान ४८.

५०) स्वातंत्र्यदिन विशेषांक, ता. १५-८-४७, पान १५.

५१) देशपांडे,बा.य., उपरोक्त, पान ५१.

५२) मासिक, तरुण भारत, बेळगाव, जानेवारी,१९२४, पान २०.

५३) झौदी,ए.एम., प्रमुख संपादक, दि एनसायक्लोपिडीया ऑफ दी इंडियन नॅशनल कॉंग्रेस, एस.चांद ॲन्ड कंपनी लि., नवीदिल्ली, इंग्रजी खंड ८ वा, १९२१, २४, १९८०, पान ३१७.

५४) मासिक तरुण भारत, बेळगाव, जून १९२४, पान ३०.
साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.५-१-२५, पान १.

५५) सामंत,भिकाजी, उपरोक्त, पान १.

५६) किता:


..

५७) इनौदी,ए.एम.,उपरोक्त, पान ३२१.

५८) साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.५-१-२५, पान १.

५९) इनौदी,ए.एम., उपरोक्त, पान ३१५.

६०) मासिक, तरूण भारत, बेळगाव, फेब्रुवारी-मार्च १९२२, पान ३३.

६१) देशपांडे,बा.य., उपरोक्त, पान ५३.

६२) कित्ता: पान ५४.
अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.८-१-५४, पान २.

६३) कित्ता:

६४) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२८-१-१९३०, पान १.

६५) पेनी,रॉबर्ट, लाईफ ॲन्ड डेथ ऑफ महात्मा गांधी, दी बोडली हेड ली, ९ बो, स्ट्रीट, लंडन, इंग्रजी, १९६९, पान ३८२.

६६) कित्ता: पान ३८५.

६७) कित्ता: पान ३९२.

६८) कित्ता: पान ३९३.

६९) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२२-४-१९३०, पान ५.

७०) देशपांडे,बा.य., उपरोक्त, पान ५७.

७१) कित्ता: पान ५६.

७२) कित्ता: पान ६७.

७३) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२९-४-१९३०, पान ५.

७४) कित्ता: ता.२२-४-१९३०, पान ४.

..

७५) कित: ता.७-१०-१९३०, पान ७.

७६) पेनी, रॉबर्ट, उपरोक्त, पान ४३३.

७७) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.४-२-३२, पान ३ व ता.६-१२-३२, पान ५.

७८) कित: ता.९-५-१९३३, पान ६.

७९) कित: ता.२-१०-१९३४, पान १, ता.१६-१०-१९३४, पान ४.

८०) साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.१९-११-३४, पान ३, ता.२१-११-१९३४, पान १०.

८१) कित: पान ११.

८२) कित: ता.२३-७-१९३५, पान ११.

८३) कित: ता.५-५-४२, पान ११.

८४) कित: ता.१-१-३६, पान ६.

८५) कुंठणाकर, बा.ज., स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकूर तृतीय स्मृतिदीन विशेषांक, ता.२३-४-१९८२, पान २.

८६) कित:

८७) कित:
हेरवाडे, श्रीधर, "जैनासह बहुजन समाजास मोठे करणारे लठ्ठे, दैनिक तरुण भारत, बेळगाव, ता.९-१२-१९८९, पान २.

८८) कित:
मळदण्णा, यशवंतदादा, स्व.आण्णासाहेब लठ्ठे" जीवन व कार्य ", लठ्ठे एज्यूकेशन सोसायटी प्रिंटींग प्रेस, सांगली, ९-१२-३६, पान ११०.

८९) कुठेणकर,बा.रं., स्मृतिसुगंध, स्मृतिदिन विशेषांक, २३-४-८२, पान ३.

९०) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.८-१-१९३४, पान १.

९१) किता: ता.११-९-१९३४, पान २.

९२) किता: ता.२३-१०-१९३४, पान १.

९३) किता: पान १.

साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.२९-१०-३४, पान २.

साप्ताहिक, राष्ट्रवीर, बेळगाव, ता.२३-१०-३४, पान ५.

९४) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२३-१०-१९३४, पान २.

९५) किता: पान १.

९६) कुठेणकर,बा.र., स्मृतिसुगंध, उपरोक्त, पान ४.

९७) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१-१-३५, पान ५.

९८) किता: ता.१२-३-३५, पान १.

सौ.प्रभू,प्रिया, उपरोक्त, पान २७.

९९) कुठेणकर,बा.र., स्मृतिसुगंध, उपरोक्त, पान ४.

१००) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.३०-८-१९३८, पान १.

१०१) किता: ता.१-२-३८, पान ७.

१०२) किता: ता.१-३-३८, पान ७.

१०३) कृपलानी,जी.म., महात्मा गांधी ' जीवन और चिंतन ', प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, हिन्दी, १९७८, पान २०१.

..

१०४) पेनी, रॉबर्ट, उपरोक्त, पान ४९८.

१०५) वामनराव सावंत, षष्ठयाब्दीपूर्ती स्मरणिका, १९७३, पान ७.

१०६) सौ. प्रमू, प्रिया, उपरोक्त, पान ३०.

१०७) किता: पान ३१.

१०८) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२२-९-४२, पान ८,
ता.४-२-४४, पान २.
साप्ताहिक बेळगाव समाचार, ता.२७-९-४२, पान ३.

१०९) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.३०-५-४४, पान २.

११०) किता: ता.१८-८-१९४२, पान २.

१११) किता: ता.२५-४-१९४४, पान १, ता.४-७-४३, पान ४.

११२) किता: साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.११-७-४४, पान ४.

११३) देशपांडे, वा.य., उपरोक्त, पान ११५, ११६.

११४) किता: पान १३०.

११५) किता: पान १७०.

११६) किता: पान १५८.

११७) किता: पान ११४.

११८) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.५-८-४७, पान १.

११९) किता:

१२०) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१९-८-१९४७, पान ५.

-000-